## <u>प्रस्तावना</u>

1.1 हृया निर्देशपुस्तकाच्या पार्श्वभूमीवरील विशिष्टता कृपया निदर्शनास आणावी (माहितीचा अधिकार अधिनियम २००५)

संसद अधिनियमानुसार आणि भारताच्या माननीय राष्ट्रपतीच्या संमतीनुसार माहितीचे अधिकार अधिनियम २००५, १२ ऑक्टोबर २००५ पासून अंमलात आला.

नागरिकांना शासकीय प्राधिका-यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या माहितीपर्यंत पोहोचण्यास व त्यात पारदर्शकता व जबाबदारीस उत्तेजन देण्याच्या दृष्टीने माहिती मिळण्याच्या अधिकाराची प्रत्यक्ष पद्धत सुरु करणारा अधिनियम म्हणून आता नागरिंकांना एखादी माहिती हवी असल्यास ? ती देणे उपयुक्त ठरले अशा त-हेने प्रमुख अधिकारी, आपत्कालीन व्यवस्थापन व मध्यवर्ती तक्रार नोंदणी विभाग, यांच्या नियंत्रणाखाली माहिती मिळविण्याकरिता आपत्कालीन व्यवस्थापन खात्याने अधिनियमाच्या कंडिका ४(१)(बी) खाली निर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रसिद्धीकरिता १७ नियमावलींचे हे निर्देश पुस्तक तयार केले आहे.

1.2 ह्या निर्देश पुस्तकाचे उद्दिष्ट / हेतू

या प्राधिका-यांच्या कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी वाढविण्याच्या दृष्टीकोनातून व या खात्याची माहिती पुरविण्याकरिता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली हे निर्देश पुस्तक तयार करण्यात आले आहे.

1.3 ह्या निर्देश पुस्तकाचा वापर कोण करु शकेल?

हे निर्देश पुस्तक नागरिकांच्या वापराकरिता संकलित आणि प्रकाशित केले आहे.

1.4 ह्या निर्देश पुस्तकामध्ये असलेल्या संघटनेची माहिती

हे निर्देश पुस्तक आणि त्यामधील माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन व मध्यवर्ती तक्रार नोंदणी विभाग या खात्याशी संबंधित आहे.

1.5 व्याख्या (निर्देश पुस्तकामध्ये वापरलेल्या विविध संज्ञा यांची कृपया व्याख्या करावी)

ह्या अहवालामध्ये वापरलेल्या सर्व संज्ञांची योग्य त-हेने व्याख्या केलेली आहे.

1.6 ह्या निर्देश पुस्तिकेमध्ये समाविष्ट असलेल्या विषयांवर अधिक माहिती तसेच अन्य माहिती कोणाला हवी असेल तर नियमपुस्तिका १६ मध्ये दिलेल्या व्यक्तींशी संपर्क साधावा.

1.7 निर्देश पुस्तिकेमध्ये उपलब्ध नसलेली माहिती मिळविण्यासाठीची पद्धत आणि शुल्क आकारावयाचे शुल्क प्रती पृष्ठाला रुपये दोन अधिक पृष्ठांच्या संख्येवर आधारित डाक नोंदणी आकार.